# आम्ही अस्वस्थ आहोत....

कुमार गंधर्वांपासून जस्टीन टिंबरलेक पर्यंत आवडेल ते ऐकणारी, किस्लोव्हस्कि पासून ते यश चोप्रा पर्यंत सर्व दिग्दर्शकांचे चित्रपट आवडीने पाहाणारी, गांधी आणि मार्क्स यांचे विचार पटूनही भांडवलशाही अर्थव्यवस्थेची फळे मुक्तपणे चाखणारी अशी आमची आजची प्युरीस्ट पिढी आहे. एकीकडे आम्हांला मल्टीप्लेक्स मधून बाहेर पडल्यावर आर्थिक विषमता जाणवते आणि खटकते सुद्धा. पण त्याच वेळी ही विषमता दूर करण्यासठी मी नेमकं काहीच करू शकत नाही असे म्हणण्याइतपत हतबलता आणि संवेदनहीनता आमच्यात मूरली आहे. अशी ही सर्वच आघाड्यांवर गोंधळलेली आमची पिढी!

व्यक्तिविकासकेंद्रित शिक्षण पद्धतीच्या ठराविक साच्यातून बाहेर पडणारा आजचा तरूण स्वतःच्या सुखी आयुष्याची स्वप्ने सहज पूर्ण करू शकतो. आमच्या मागच्या पिढीला जगण्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी जितकी धडपड करावी लागे त्या तुलनेने आज आमच्या समोर अनेक नवीन पर्याय आहेत. जागतिकिकरणामुळे रोजगाराच्या असंख्य संधी आज उपलब्ध आहेत. थोडक्यात काय, तर आज स्वतःचा विकास करून घेण्यासाठी साधनांची कमतरता नाही.

पण स्वतःचा विकास करून घेणे तत्वतः जरी बरोबर असले तरी ‘विकास’ कशाला म्हणायचं हेच मूळातून आम्हाला कळालं आहे असं आम्हाला वाटत नाही. कारण शेजारच्याला स्पर्धक मानून त्याच्या पूढे जाण्यासाठी प्रयत्न करणे हीच सध्याची विकासाची कल्पना आहे. याची सुरवात अगदी शालेय शिक्षणापासूनच होते. वर्गात पहिल्या पाचात येणे हेच शाळेच्या १० वर्षातले आमचे परमोच्च ध्येय ठरवल्या जाते आणि त्या एकमेव निकषावर आमच्या प्रगतीचे मोजमाप केल्या जाते. शेजारच्याला मागे टाकून ‘मला’ पुढे जायचयं ही वृत्ती नकळत आमच्या रक्तात भिनवल्या जाते.

आमचा विरोध या व्यवस्थेला तर आहेच पण त्याहीपेक्षा समाजाच्या या मानसिकतेला आहे. स्पर्धेत टिकून राहाण्यासाठी काही मूलभूत गोष्टीची गरज असते हे आम्हांलाही मान्य आहे. पण सुखी आयुष्याच्या ‘त्यांच्या’ कल्पना आणि स्वप्ने आमच्यावर लादल्या जातात तेव्हा गोची होते. या दुय्यम गरजांच्या मागे लागून आम्ही आमची स्वतःची स्वप्ने पाहाण्याची ताकद गमावून बसतो हे आमच्या पालकांच्या लक्षातच येत नाही. जगणं खूप अवघड आहे हेच आमच्यावर सतत बिंबवल्या जातं. या सततच्या दबावामुळे चाकोरी बाहेर विचार करण्याची आमची क्षमताच मारून टाकल्या जाते.
आपली शिक्षणपद्धती तर या सर्व मानसिक खच्चीकरणाला अत्यंत पूरक आहे. मूळात स्वतःच्या साम्राज्य विकासासाठी आणि स्वार्थासाठी जाणीवपूर्वक इंग्रजांकडून घडवण्यात आलेली ही ‘कारकूनी’ शिक्षण पद्धती आज ६० वर्षांनंतर सुद्धा जशीच्या तशी आमच्या माथी मारल्या जाते. पाश्चात्यांच्या प्रगतीचे कौतुक करताना त्या प्रगती मागे असणारी मुक्त आणि प्रयोगशील शिक्षणपद्धती सोयिस्कररीत्या दूर्लक्षिण्यात येते.

शिक्षणाने ज्ञानाच्या कक्षा रूंदावतात, पण याच कक्षा ‘नोकरी आणि पैसा’ या चौकटीत पुन्हा कोंडल्या जातात. शिक्षणातून मिळणारं कौशल्य घेऊन आज आम्ही नोकरीतून मिळनाऱ्या ‘सेक्युरिटी‘ च्या मागे लागतो. प्लेसमेंट हा जिथे परवलीचा शब्द झालाय आणि त्यातून मिळणाऱ्या नोकरीत जीवनाची सार्थकता मानल्या जाते तिथे ह्या सगळ्याला खरचं किती अर्थ आहे याचा विचार करणे

शक्यच नसते. नोकरीतून वाढत जाणारी आर्थिक क्षमता आपल्या गरजा अधिक वाढवत जाते. पुन्हा, मिळवलेला पैसा खर्च करण्यासाठी मॉल संस्क्रुती पायघड्या पसरून बसलेलीच असते.
कंन्झूमरिझम च्या चक्राता आपण गुरफ़टल्या जातोय हा विचारच मनात येत नाही. येईलही कसा? जिथे २–३ बिएचके चा फ्लॅट शहरात मिळवण्यातच मध्यमवर्गाचे हात स्वर्गाला पोहचतात तिथे यापेक्षा वेगळा विचार करण्याची शक्यताच नाही.

खरं तर प्रगतीच्या आपल्या संकल्पना आपण पुन्हा तपासून पाहायला हव्यात. विकसित राष्ट्रांचं उदाहरण समोर ठेऊन त्या दिशेने जाण्याआधी त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांची जाणीव आपण ठेवायला हवी.

आय.आय.टी.सारख्या तंत्रज्ञानाच्या सर्वोच्च संस्थासुद्धा विकासाच्या संकल्पना बदलून नवीन प्रयोग करत आहे. त्यांचे बहुतांश प्रयोग खेड्याला केंद्रस्थानी ठेऊन सुरू आहेत. सुदैवाने विकसनशील अवस्थेत असतानाच याचा विचार करण्याची संधी आपल्याला मिळाली आहे. राष्ट्र पातळीवर याचा विचार करतानाच वैयक्तिक पतळीवर देखील स्वतःला बदलण्याची गरज आहे. किंबहुना, स्वतःला बदलणे हीच या बदलाची पहिली पायरी आहे. मॉल–मल्टीप्लेक्स मधून बाहेर पडल्यावर जाणवणारी अस्वस्थता ही या बदलाची सुरूवात असते.

स्वतःची संवेदनशीलता आणि अस्वस्थपणा यांचा नीट विचार केला तर आपण या प्रश्नाला कसे जोडून घेऊ शकतो याचा विचार आपण करू लागतो. मग मी कोण? आणि या व्यवस्थेशी माझा काय संबंध? या प्रश्नांच भूत एकदा मानगूटीवर बसलं की विचारांना आपोआप चालना मिळते.
मी कोण? या तात्विक प्रश्नाला थोडसं बदलून त्याऐवजी ‘मी कोणाचा?’ असा प्रश्न जर स्वतःला विचारला तर बरीच उरफोड आणि गुंतागूंत कमी होते. कारण स्वतःचा शोध घेणे वगैरे गोष्टींच्या मागे लागून जो भरकटण्याचा संभव असतो, तो टळतो.
मी कोणाचा हा स्वतःला विचारलेला प्रश्न बऱ्याच प्रश्नांना उत्तर देऊ शकतो. मी माझ्या कुटंबाचा, माझ्या कामाचा/ नोकरीचा/ मित्र–मैत्रिणींचा या सगळ्या नंतर मी माझ्या समाजाचा हे उत्तर एका टप्प्यावर येतेच.
आणि एकदा हे स्पष्ट झालं की आपली कुटुंब आणि समाजाची व्याख्या आणि व्याप्ती देखील बदललेली आणि विस्तारलेली असते.

आय. आय. टी. पवईतून एम.टेक. ची डिग्री घेणारा प्रियदर्शन सारखा मेकॅनिकल इंजिनीअर, प्लेसमेंटच्या अनेक संधी सोडून जेंव्हा एम.के.सी.एल.च्या माध्यमातून समाजातल्या प्रश्नांना भिडतो तेव्हा त्याच्या या वेगळा विचार करण्यामागे प्रस्थापित विरोधापेक्षा अधिक असा अस्वस्थपणा असतो. किंवा खानदेशातील ग्रामीण भागातून कला शाखेची पदवी घेऊन आय.ए.एस. होण्याच्या ध्येयाने पुण्यात येऊन तयारी करणारा गोपाळ या सगळ्याची निरर्थकता लक्षात आल्यावर गडचिरोली जिल्ह्यातल्या गावांमधे नॉलेज अक्टिव्हिस्ट तयार करण्यासाठी प्रयत्न करू लागतो.
सध्याच्याच पिधीतले हे अस्वस्थ तरूण. पदवी पूर्ण केलेले आणि त्यानंतर सेटल होण्याची क्षमता असणारे. मध्यमवर्गीय सुबत्ता मिळवण्याची पात्रता असतानासुद्धा करीअर, स्टेटस आणि सुखी आयुष्याच्या कल्पना जाणीवपूर्वक नाकारून स्वतःची वेगळी वाट शोधण्याची जिद्द दाखवतात.

सामाजिक प्रश्नांची जाणीव होऊन त्यावर उपाय शोधणे ही प्रक्रिया मोठी आणि गुंतागुंतीची असली तरी या प्रक्रियेतून जाताना प्रत्येकाची वैचारिक प्रगल्भता वाढत असते. माझा ‘स्वतःचा’ विकास हा आत्मकेंद्री विचार मागे पडून सगळ्यांचा विचार करण्यची मनोवृत्ती तयार होते. एखाद्या उद्दात्त ध्येयासाठी सगळ्यांना घेऊन आपण काम करतो तेव्हा माणसं पटकन जोडल्या जातात. वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी काम करून देखील शेजारच्याशी नाळ न जोडल्या जाण्याची शक्यताच संपते. आपल्या मूल्यांसाठी ठामपणे उभे राहतांना, त्यासाठी लढताना आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत, या वेगळ्या वाटेवर देखील एकटे नसून आपणासारखीच सहृदयी जीवलग आहेत ही सुखद जाणीव होते. आपलं काम हा नुसता ‘जॉब’ बनून न राहता ती स्वतःहून घेतलेली ‘जबाबदारी’ बनते.

‘निर्माण’ च्या माध्यमातून सामाजिक,वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रश्नांना घेऊन काम करणाऱ्या समविचारी तरूणांची सूत्रबद्ध चळवळ उभारण्याचा आमचा प्रयत्न आहे. असे प्रश्न केंद्रस्थानी ठेऊन त्याभोवती स्वतःची जीवनशैली विणण्याची आमची इच्छा आहे. कारण तो सामाजिक प्रश्न सोडवताना माझी कौशल्ये मला पूर्णपणे वापरता येणार आहेत आणि यातूनच माझा विकास होणार आहे. आमच्या प्रयत्नांनी जगातल्या सगळ्या वाईट गोष्टी नष्ट होउन सगळं जग सुजलाम सुफलाम होईल असा भाबडा आशावाद आम्ही बाळगत नाही. कारण कुठलीही समाजव्यवस्था पूर्णपणे चांगली किंवा वाईट नसते तर चांगली ‘आणि’ वाईट असते हेच आम्हाला शिकवल्या गेलय. हे चांगले बदल घडवून आणण्यासाठी समाजानेच आम्हांला उपलब्ध करून दिलेली चौकट आम्ही वापरणार आहोत, विस्तारणार आहोत आणि प्रसंगी मोडणार देखील आहोत.

– सागर जोशी,
‘निर्माण’